16/05/2019

नमुना-६

दस्त क्र. 2324 /2019

9 — 36

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 NASIK-6

हे प्रमाणपत्र मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ अन्वये असलेल्या नियमान्वये निर्गमीत केलेले आहे. परंतु उक्त दस्त नोंदणीसाठी नोंदणी अधिकाऱ्या समोर दाखल झाल्यास नोंदणी अधिनियम १९०८ च्या अधिनियमातील तरतुदीनुसार नोंदणी अधिकारी दस्त नोंदणीची कार्यवाही करतील

CERTIFICATE

US 32 (1) (b) of the Maharashtra Stamp Act 1958.

Office of the
Collector of Stamps, Nashik
Case No. Adj. 156/19
Date: 16/05/2019

Received from Shri. S.R. Construction
Residing at Sharanpur road Nashik
Stamp duty of Rs. (9,94,900) Nine lakh
Ninety four thousand Nine hundred only
vide challan No. Dated 11/07/2019
MH003895422019E
0002866422019D
Certified under section 32 (1) (b) of the Maharashtra Stamp Act 1958 that the full duty of Rs. 9,94,900/-
with which this instrument is chargeable has been paid vide article no. 5(g)(g) of schedule

This Certificate is subject to the provision of Section 53 (A) of the Maharashtra Stamp Act 1958

Place : Nashik
Date : 15/07/2019


Collector of Stamps
Nashik

SEAL OF THE COLLECTOR OF STAMPS मुद्रांक जिल्हाधिकारी नाशिक यांची मुद्रा NASHIK

मुल्यांकन विभाग क्रमांक १.२.११
अंतिम भूखंड क्रमांक ३५९ (न.र.यो.क्र.२)
प्लॉटचे दर प्रति चौरस मिटर रूपये ४८,९००/-
प्लॉटचे क्षेत्र ५४१.६२ चौरस मिटर
प्लॉटचे मुल्यांकन रूपये २,६४,८६,०००/-
बांधकामाचे दर प्रति चौरस मिटर रूपये २२,०००/-
मोबदल्यापोटी देणार असलेल्या सदनिकांचे चटई ४४६.०४ चौ. मि.
मोबदल्यापोटी देणार असलेल्या सदनिकांचे मुल्यांकन रूपये
मुद्रांक रूपये ----------/-
नोंदणी शुल्क रूपये ३०,०००/-

प्लॉट मिळकत विकसीत करणेचा करारनामा

प्लॉट मिळकत विकसीत करणेचा करारनामा आज दिनांक माहे एप्रिल इसवी सन २०१९ ते दिवशी, नाशिक मुक्कामी-





लिहून घेणार पक्ष नंबर १

एस आर कन्स्ट्रक्शन्स, (पॅन : ए ए जे एफ एस ०८३९ ई) भागीदारी संस्था तर्फे भागीदार –

१. श्री. राजेंद्र रामचंद्र बागड,

उ.व. – ६२, धंदा– शेती व व्यापार, (पॅन :– ए ए क्यु पी बी ९७७८ ई)

२. श्री. सुनिल पुरूषोत्तम गवादे,

उ.व.– ५२, धंदा– शेती व व्यापार, (पॅन :– ए ए यु पी जी २९४१ जी)

३. श्री. सुनिल माधव सावंत,

उ.व.– ५५, धंदा– शेती व व्यापार, (पॅन :– ए पी बी पी एस ३४२८ जे)

कार्यालयाचा पत्ता : फ्लॅट नंबर १ व २, रामतिर्थ, पार्क, साधुवासवाणी रोड, कुलकर्णी गार्डन जवळ, नाशिक–४२२००२.

यांसी

लिहून देणार पक्ष नंबर २

एकदंत को.ऑप. हौसिंग सोसायटी लि. नाशिक, महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम १९६० मधील कलम ९(१) अन्वये नोंदविलेत आलेली गृहनिर्माण संस्था हीचा नोंदणी क्रमांक – एनएसके– एचएसजी –५५१/७८ दिनांक ८/६/१९७८, तर्फे विद्यमान चेअरमन

डॉ. श्री. रविंद्र मोरेश्वर कुलकर्णी,

उ.व. ६०, धंदा– वैद्यकिय व्यवसाय, (पॅन :– ए बी यु पी के ५१६९ आर)

रा. फ्लॅट नंबर ६, एकदंत को.ऑप. हौसिंग सोसायटी, रचना लेन, शरणपुर रोड, नाशिक, –४२२००२.



आणि

मान्यता/ संमती देणार पक्ष नंबर ३ (सर्व जुने सोसायटी सभासद) -

श्री.विवेक प्रभाकर कासार

श्री. विवेक प्रभाकर कासार

श्री.मिलींद सुरेश पांडकर

श्रीमती शोभा चिंतामन कोठावदे

श्री.प्रभाकर रामकृष्ण काटकर

सौ. सुलोचना पभाकर काटकर

श्री.दिनकर कल्याणराव देशमुख

सौ.चंद्रसेना रमेश गायकवाड

श्री.रविंद्र मोरेश्वर कुलकर्णी

श्री.प्रथमेश मोहन फाटक

श्री.प्रकाश त्र्यंबक काण्णव

श्रीमती यशोदा खंदारे

नंसन-६
दस्त क्र.(२३२५ /२०१६)
३ — ३६

कारणे प्लॉट मिळकत विकसीत करणेचा करारनामा लिहून देतात की,

१. मिळकतीचे वर्णन :- तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालीका हद्दीतील, मौजे नाशिक गांवचे शिवारातील बिनशेती प्लॉट मिळकत, यांसी रेव्हेन्यू सर्व्हे नंबर ६४९अ/२ पैकी प्लॉट क्रमांक ८ यांसी एकुण क्षेत्र ५४१.६२ चौरस मिटर, यांसी बिनशेती आकार रूपये ११२२.०० पैसे, यांसी चतु:सिमा येणे प्रमाणे :-

पूर्वेस :- रेव्हेन्यु सर्व्हे नंबर ६४९-अ/१ ची मिळकत,
पश्चिमेस :- ४० फुट रूंदीचा रस्ता
दक्षिणेस :- रेव्हेन्यु सर्व्हे नंबर ६४९अ/२ पैकी प्लॉट क्रमांक ९ ची मिळकत,
उत्तरेस :- रेव्हेन्यु सर्व्हे नंबर ६४९अ/२ पैकी प्लॉट क्रमांक ७ ची

मिळकत,
येणे प्रमाणे जल-तरू, काष्ट-पाषाण, निधी-निक्षेप, तदंगभुत वस्तुंसह तसेच प्लॉट मिळकतीत जाणे-येणेसाठी असलेले रस्ते व लेआऊटमधील सामाईक सुविधा वापरण्याचे हक्कांसह चतु:सिमेतील दरोबस्त बिनशेती प्लॉट मिळकत. या प्लॉट मिळकत विकसित करणेचा करारनामा (डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट) चे दस्तात वर वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीचा उल्लेख "उपरोक्त/सदर प्लॉट मिळकत" असा करण्यात आला आहे. लिहून घेणार यांचा उल्लेख पक्ष नंबर १ व लिहून देणार यांचा उल्लेख पक्ष नंबर २ असा करणेत आला असुन या संज्ञामध्ये पक्ष नंबर १ या संस्थेचे सर्व भागीदार, त्यांचे वंशज, वारसदार, कुटूंबिय आणि पक्ष नंबर २ या गृहनिर्माण संस्थेचे सर्व पदाधिकारी व सभासदांचा समावेश आहे.)

२. वर कलम १ यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकत पक्ष नंबर २ यांचे खरेदी मालकीची व कबजातील असून प्लॉट मिळकतीचे अधिकार अभिलेखपत्रकात मालक व कबजेदार सदरी नोंद नंबर १६३४३ अन्वये पक्ष नंबर २ यांचे नांवाची नोंद आहे. सदर प्लॉट मिळकत विकसित करणेचा अथवा विकसीत करणेसाठी देणेचा पक्ष नंबर २ यांना हक्क आहे.

३. उपरोक्त प्लॉट मिळकतीत हल्ली असलेल्या इमारतीत एकुण १२ सदनिका असुन तिचा तपशिल खाली नमुद केल्याप्रमाणे आहे.

सदनिका क्रमांक	मजला	चटई क्षेत्र (कारपेट एरिया) चौ.मि.	सभासदांची नांवे
१	तळमजला	२५.५५	श्री.दिनकर कल्याणराव देशमुख
२	तळमजला	२४.१६	श्रीमती यशोदा खंदारे

नसन-६
दस्त क्र.| 2325 /2019
४ — ३५
३

३	तळमजला	२४.१६	श्री.प्रथमेश मोहन फाटक
४	तळमजला	२४.१६	श्रीमती शोभा चिंतामन कोठावदे
५	तळमजला	२४.१६	सौ.सुलोचना पद्माकर काटकर
६	तळमजला	२५.५५	श्री.रविंद्र मोरेश्वर कुलकर्णी
७	पहिला	२५.५५	सौ.चंद्रसेना रमेश गायकवाड
८	पहिला	२४.१६	श्री. विवेक प्रभाकर कासार
९	पहिला	२४.१६	श्री.प्रकाश त्र्यंबक काण्णव
१०	पहिला	२४.१६	श्री.विवेक प्रभाकर कासार
११	पहिला	२४.१६	श्री.प्रद्माकर रामकृष्ण काटकर
१२	पहिला	२५.५५	श्री.मिलींद सुरेश पांडकर

४. उपरोक्त प्लॉट मिळकतीत हल्ली असलेली इमारत सुमारे ४० वर्षे जुनी असल्याने इमारतीची देखभाल करणे, दुरूस्ती करणे खर्चीक झाले आहे. सदर इमारत पाडून त्या ठिकाणी नविन इमारतीचे बांधकाम करणेची म्हणजेच पुनर्विकास (रि डेव्हलपमेंट) करणेची पक्ष नंबर २ यांचे सर्व सभासदांनी इच्छा व्यक्त करून मागणी केल्याने संस्थेने तिच्या दिनांक २१/१/२०१८ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत इमारत पुनर्विकास (रि डेव्हलपमेंट) करणेचा निर्णय घेतला. तथापी पक्ष नंबर २ चे सभासदांना बांधकाम क्षेत्रातील कामे करणेसाठी पुरेसा वेळ व निधी उपलब्ध होत नसल्याने सदर प्लॉटस् मिळकती विकसित करणेसाठी संस्थेच्या सभासदांनी परिसरातील परिचयाच्या नामवंत विकसकांच्या निविदा मागविल्या. त्यानुसार संस्थेस निरनिराळे विकसकांकडून/ बांधकाम व्यावसायीकांकडून पाच निविदा प्राप्त झाल्यात. सदर निविदापैकी पक्ष नंबर १ यांचे निविदात नमुद केलेला बांधकामाचा दर्जा व सोईसुविधा या इतर निविदात नमुद केल्यापेक्षा श्रेष्ठ असल्याने व त्या निविदावर विचार विनिमय केल्यानंतर सर्व सभासदांचे एकमत झाल्याने संस्थेचे दिनांक २१/१/२०१८ रोजीचे विशेष सर्वसाधारण सभेत पक्ष नंबर १ यांची विकासक म्हणून नेमणूक करण्याबाबत ठराव क्रमांक २ मंजुर करणेत आला. पक्ष नंबर २ संस्थेस मे.उपनिबंधक सहकारी संस्था, नाशिक तालुका, नाशिक यांनी त्यांचेकडील जा.क्र. वि-१/ हौ.सो./पुनर्विकास/परवानगी/१८ दिनांक १४/३/२०१८ अन्वये पुनर्विकास करणेस परवानगी दिली आहे. पक्ष नंबर २ यांचे सभेत मंजुर झालेल्या ठरावानुसार प्लॉट मिळकतीचे विकसनाबाबत पक्ष नंबर १ व पक्ष नंबर २ यांचे दरम्यान ठरलेल्या अटी व शर्तीनुसार पक्ष नंबर १ यांचे लाभात विकसन करारनामा व जनरल मुखत्यारपत्र लिहून व मे.सहदुय्यम निबंधक साहेब वर्ग-२, नाशिक यांचे कार्यालयात नोंदवून देणेचे अधिकार पक्ष नंबर २ यांचे विद्यमान चेअरमन डॉ. श्री. रविंद्र कुलकर्णी यांना दिलेत. उपरोक्त प्लॉट मिळकतीत २० (वीस) सदनिका समाविष्ट असलेल्या इमारतीचे बांधकाम करून त्यातील सदनिका क्रमांक २, ३, ४, ७, १३, १४, १८ व १९ विक्री करण्याचे जे हक्क पक्ष नंबर १ यांना पक्ष नंबर २ यांनी दिले आहेत त्याचे मोबदल्यात पक्ष नंबर १ यांनी नियोजित

नमुना-६

दस्त क्र.(2324 /2019)

५ — ३६

इमारतीतील सदनिका क्रमांक १, ५, ६, ८, ९, १०, ११, १२, १५, १६, १७ व २० अशा एकूण १२ सदनिका पक्ष नंबर २ यांचे सभासदांना देणेचे मान्य केले असल्याने पक्ष नंबर १ यांचे लाभात पक्ष नंबर २ हे प्रस्तुत विकसन करारनामा लिहून देत आहेत. सदर विकसन करारनामा व जनरल मुखत्यारपत्रातील संपुर्ण मजकुर पक्ष नंबर २ यांचे सर्व सभासदांनी वाचून समजावून घेतले आहे व त्याचे मान्यतेसाठी वेगळे संमतीपत्र तयार करून त्यावर सहया व अंगठे केले आहेत. सदर संमतीपत्र या विकसन करारनाम्या सोबत जोडले आहे.

५. वर कलम १ यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकती बांधकाम करणेसाठी नियमानुसार वापरता येणारे चटई क्षेत्र+टी.डी.आर.+प्रिमियम एफ.एस.आय. चा वापर करून प्लॉट मिळकतीत बांधकाम करणेचे व नियोजित इमारतीतील २, ३, ४, ७, १३, १४, १८ व १९ सदनिकांची विक्री करण्याचे जे हक्क व अधिकार पक्ष नंबर २ यांनी पक्ष नंबर १ यांना दिले आहेत त्याचा मोबदला म्हणून पक्ष नंबर १ यांनी पक्ष नंबर २ यांचे सभासदांना उपरोक्त प्लॉट मिळकतीत पक्ष नंबर १ हे बांधणार असलेल्या इमारतीतील खाली वर्णन केलेल्या सदनिका मालकी हक्काने देण्याचे मान्य केले आहे.

सदनिका क्रमांक	मजला	चटई क्षेत्र (कारपेट एरिया) चौ.मि.	सभासदांची नावे
१	पहिला	३७.१७ + बाल्कनी ४.१८	श्री.विवेक प्रभाकर कासार
५	पहिला	३७.१७+ बाल्कनी ४.१८	श्री.विवेक प्रभाकर कासार
६	दुसरा	३७.१७+ बाल्कनी ४.१८	श्री.मिलींद सुरेश पांडकर
८	दुसरा	३७.१७+ बाल्कनी ४.१८	श्रीमती. शोभा चिंतामण कोठावदे
९	दुसरा	३७.१७+ बाल्कनी ४.१८	श्री.पद्माकर रामकृष्ण काटकर
१०	दुसरा	३७.१७+ बाल्कनी ४.१८	सौ.सुलोचना पद्माकर काटकर
११	तिसरा	३७.१७+ बाल्कनी ४.१८	श्री.दिनकर कल्याणराव देशमुख
१२	तिसरा	३७.१७+ बाल्कनी ४.१८	सौ.चंद्रसेना रमेश गायकवाड
१५	तिसरा	३७.१७+ बाल्कनी ४.१८	श्री.रविंद्र मोरेश्वर कुलकर्णी

नमुना-६
दस्त क्र. 2324/2011
६— ३६

१६	चौथा	३७.१७+ बाल्कनी ४.१८	श्री.प्रथमेश मोहन फाटक
१७	चौथा	३७.१७+ बाल्कनी ४.१८	श्री.प्रकाश त्र्यंबक काण्णव
२०	चौथा	३७.१७+ बाल्कनी ४.१८	श्रीमती.यशोदा नारायण खंदारे

वरील प्रमाणे एकूण १२ सदनिका, यांसी एकत्रित चटई क्षेत्र ४४६.०४ चौरस मिटर पक्ष नंबर २ यांचे सभासदांना देणेचे पक्ष नंबर १ यांनी मान्य केले आहे. या व्यतिरिक्त अन्य कोणताही मोबदला रकमेच्या अथवा बांधकामाचे स्वरूपातील मिळणेचा पक्ष नंबर २ यांना अथवा त्यांचे सभासदांना हक्क रहाणार नाही असे पक्ष नंबर २ यांनी मान्य केले आहे. इमारतीतील वहानतळाचे जागेचे वाटप (ॲलोटेड पार्किंग) पक्ष नंबर १ यांनी इमारतीतील प्रत्येक सदनिका धारकास करून देणेचे आहे.

उपरोक्त प्लॉट मिळकतीत बांधकाम करणेसाठी पक्ष नंबर १ यांनी तयार करून घेतलेला बांधकाम नकाशानुसार पक्ष नंबर २ यांचे सभासदांना मोबदल्यापोटी देण्यात येणाऱ्या सदनिकांपैकी सदनिका क्रमांक १, ५, ६, ८, १०, ११, १५, १६ व २० या सदनिकांचे चटई क्षेत्रात व बाल्कनीचे क्षेत्रात पुढीलप्रमाणे वाढ झालेली असल्याने वाढीव क्षेत्राचा मोबदला व सदर सदनिकांत पक्ष नंबर २ यांचे मागणीनुसार पक्ष नंबर १ ज्या सुविधा पुरविणार आहेत त्याचा मोबदला म्हणून पक्ष नंबर २ यांचे खाली नमुद केलेल्या सभासदांनी आजपासुन चार महिने मुदतीत पक्ष नंबर १ यांना खाली नमुद केल्याप्रमाणेची रक्कम देणेचे मान्य केले आहे.

ए) श्री. विवेक प्रभाकर कासार यांना मोबदल्यापोटी सदनिका क्रमांक १ यांसी चटई क्षेत्रफळ ३७.१७ चौ.मि. + ४.१८ चौ.मि. क्षेत्रफळ असलेली बाल्कनी देणेचे ठरले होते मात्र प्रत्यक्षात सदनिकाचे चटई क्षेत्रफळ ३९.६२ चौ.मि. व बाल्कनीचे क्षेत्रफळ ५.०८ चौ.मि. इतके देण्यात येणार असल्याने वाढीव क्षेत्रफळासाठी व सदर सदनिकांत श्री.विवेक कासार यांना पाहिजे असलेल्या सुविधांसाठी त्यांनी पक्ष नंबर १ यांना रक्कम रूपये १,८०,०००/- (रूपये एक लाख ऐंशी हजार मात्र) देणेचे आहेत.

बी) श्री. विवेक प्रभाकर कासार यांना मोबदल्यापोटी सदनिका क्रमांक ५ यांसी चटई क्षेत्रफळ ३७.१७ चौ.मि. + ४.१८ चौ.मि. क्षेत्रफळ असलेली बाल्कनी देणेचे ठरले होते मात्र प्रत्यक्षात सदनिकाचे चटई क्षेत्रफळ ५२.१७ चौ.मि. व बाल्कनीचे क्षेत्रफळ ४.०५ चौ.मि. इतके देण्यात येणार असल्याने सदनिकाचे वाढीव क्षेत्रफळासाठी व सदर सदनिकांत

नमुना-६
दस्त क्र.(२३२५ /२०१९)
८ — ३६



श्री.विवेक कासार यांना पाहिजे असलेल्या सुविधांसाठी त्यांनी पक्ष नंबर १ यांना रक्कम रूपये १३,५०,०००/- (रूपये तेरा लाख पन्नास हजार मात्र) देणेचे आहेत.

सी) श्री. मिलींद सुरेश पांडकर यांना मोबदल्यापोटी सदनिका क्रमांक ६ यांसी चटई क्षेत्रफळ ३७.१७ चौ.मि. + ४.१८ चौ.मि. क्षेत्रफळ असलेली बाल्कनी देणेचे ठरले होते मात्र प्रत्यक्षात सदनिकाचे चटई क्षेत्रफळ ३९.६२ चौ.मि. व बाल्कनीचे क्षेत्रफळ ५.०८ चौ.मि. इतके देण्यात येणार असल्याने वाढीव क्षेत्रफळासाठी व सदर सदनिकांत श्री. मिलींद सुरेश पांडकर यांना पाहिजे असलेल्या सुविधांसाठी त्यांनी पक्ष नंबर १ यांना रक्कम रूपये १,८०,०००/- (रूपये एक लाख ऐंशी हजार मात्र) देणेचे आहेत.

डी) श्रीमती. शोभा चिंतामण कोठावदे यांना मोबदल्यापोटी सदनिका क्रमांक ८ यांसी चटई क्षेत्रफळ ३७.१७ चौ.मि. + ४.१८ चौ.मि. क्षेत्रफळ असलेली बाल्कनी देणेचे ठरले होते मात्र प्रत्यक्षात सदनिकाचे चटई क्षेत्रफळ ३६.४६ चौ.मि. व बाल्कनीचे क्षेत्रफळ १०.४६ चौ.मि. इतके देण्यात येणार असल्याने वाढीव क्षेत्रफळासाठी व सदर सदनिकांत श्रीमती शोभा चिंतामण कोठावदे यांना पाहिजे असलेल्या सुविधांसाठी त्यांनी पक्ष नंबर १ यांना रक्कम रूपये ६,३०,०००/- (रूपये सहा लाख तीस हजार मात्र) देणेचे आहेत.



ई) सौ. सुलोचना पदमाकर काटकर यांना मोबदल्यापोटी सदनिका क्रमांक १० यांसी चटई क्षेत्रफळ ३७.१७ चौ.मि. + ४.१८ चौ.मि. क्षेत्रफळ असलेली बाल्कनी देणेचे ठरले होते मात्र प्रत्यक्षात सदनिकाचे चटई क्षेत्रफळ ५२.१७ चौ.मि. व बाल्कनीचे क्षेत्रफळ ४.०५ चौ.मि. इतके देण्यात येणार असल्याने वाढीव क्षेत्रफळासाठी व सदर सदनिकांत सौ. सुलोचना पदमाकर काटकर यांना पाहिजे असलेल्या सुविधांसाठी त्यांनी पक्ष नंबर १ यांना रक्कम रूपये १३,५०,०००/- (रूपये तेरा लाख पन्नास हजार मात्र) देणेचे आहेत.

एफ) श्री. दिनकर कल्याणराव देशमुख यांना मोबदल्यापोटी सदनिका क्रमांक ११ यांसी चटई क्षेत्रफळ ३७.१७ चौ.मि. + ४.१८ चौ.मि. क्षेत्रफळ असलेली बाल्कनी देणेचे ठरले होते मात्र प्रत्यक्षात सदनिकाचे चटई क्षेत्रफळ ३९.६२ चौ.मि. व बाल्कनीचे क्षेत्रफळ ५.०८ चौ.मि. इतके देण्यात येणार असल्याने वाढीव क्षेत्रफळासाठी व सदर सदनिकांत श्री. दिनकर कल्याणराव देशमुख यांना पाहिजे असलेल्या सुविधांसाठी त्यांनी पक्ष नंबर १ यांना रक्कम रूपये १,८०,०००/- (रूपये एक लाख ऐंशी हजार मात्र) देणेचे आहेत.

जी) श्री. रविंद्र मोरेश्वर कुलकर्णी यांना मोबदल्यापोटी सदनिका क्रमांक १५ यांसी चटई क्षेत्रफळ ३७.१७ चौ.मि. + ४.१८ चौ.मि. क्षेत्रफळ असलेली बाल्कनी देणेचे ठरले होते मात्र प्रत्यक्षात सदनिकाचे चटई क्षेत्रफळ ५२.१७ चौ.मि. व बाल्कनीचे क्षेत्रफळ ४.०५ चौ.मि. इतके देण्यात येणार असल्याने वाढीव क्षेत्रफळासाठी व सदर सदनिकांत श्री. रविंद्र

नमुना-६
दस्त क्र.| 2324 /2019
८ — ३६

मोरेश्वर कुलकर्णी यांना पाहिजे असलेल्या सुविधांसाठी त्यांनी पक्ष नंबर १ यांना रक्कम रूपये १३,५०,०००/- (रूपये तेरा लाख पन्नास हजार मात्र) देणेचे आहेत.

एच) श्री. प्रथमेश मोहन फाटक यांना मोबदल्यापोटी सदनिका क्रमांक १६ यांसी चटई क्षेत्रफळ ३७.१७ चौ.मि. + ४.१८ चौ.मि. क्षेत्रफळ असलेली बाल्कनी देणेचे ठरले होते मात्र प्रत्यक्षात सदनिकाचे चटई क्षेत्रफळ ३९.६२ चौ.मि. व बाल्कनीचे क्षेत्रफळ ५.०८ चौ.मि. इतके देण्यात येणार असल्याने वाढीव क्षेत्रफळासाठी व सदर सदनिकांत श्री. प्रथमेश मोहन फाटक यांना पाहिजे असलेल्या सुविधांसाठी त्यांनी पक्ष नंबर १ यांना रक्कम रूपये १,८०,०००/- (रूपये एक लाख ऐंशी हजार मात्र) देणेचे आहेत.

आय) श्रीमती.यशोदा नारायण खंदारे यांना मोबदल्यापोटी सदनिका क्रमांक २० यांसी चटई क्षेत्रफळ ३७.१७ चौ.मि. + ४.१८ चौ.मि. क्षेत्रफळ असलेली बाल्कनी देणेचे ठरले होते मात्र प्रत्यक्षात सदनिकाचे चटई क्षेत्रफळ ५२.१७ चौ.मि. व बाल्कनीचे क्षेत्रफळ ४.०५ चौ.मि. इतके देण्यात येणार असल्याने वाढीव क्षेत्रफळासाठी व सदर सदनिकांत सौ.यशोदा नारायण खंदारे यांना पाहिजे असलेल्या सुविधांसाठी त्यांनी पक्ष नंबर १ यांना रक्कम रूपये १३,५०,०००/- (रूपये तेरा लाख पन्नास हजार मात्र) देणेचे आहेत.

जे) श्री.पदमाकर रामकृष्ण काटकर यांना मोबदल्यापोटी सदनिका क्रमांक ९ यांसी चटई क्षेत्रफळ ३७.१७ चौ.मि. + ४.१८ चौ.मि. क्षेत्रफळ असलेली बाल्कनी देणेचे ठरले होते मात्र प्रत्यक्षात सदनिकाचे चटई क्षेत्रफळ २८.७८ चौ.मि. व बाल्कनीचे क्षेत्रफळ ३.३ चौ.मि. इतके देण्यात येणार असल्याने श्री.पदमाकर रामकृष्ण काटकर यांना कमी मिळणाऱ्या क्षेत्रफळासाठी भरपाई म्हणून रक्कम रूपये ८,१०,०००/- (रूपये आठ लाख दहा हजार मात्र) पक्ष नंबर १ यांनी देणेचे आहेत.

के) सौ.चंद्रसेना रमेश गायकवाड व श्री.प्रकाश त्र्यंबक काण्णव यांना मोबदल्यापोटी देण्यात येणाऱ्या सदनिकांचे क्षेत्रात कोणताही बदल नसल्याने त्यांचेकडून पक्ष नंबर १ यांना कोणतीही रक्कम घेणे अथवा देणे नाही.

६) सदर मिळकतीमधील नविन कार्पेट बांधकामाचे क्षेत्र ७७४.३६ चौ मी असून त्याचे जुन्या व नविन क्षेत्राचे वर्गीकरण खाली नमूद केल्यात तक्त्याप्रमाणे आहे.

सदनिका क्रमांक	मजला	सभासदांची नांवे	जुना कारपेट एरिया चौ.मि.	नविन कार्पेट विना मोबदला चौ.मि.	अतिरिक्त कार्पेट क्षेत्र मोबदला सह

नमुना-६
दस्त क्र.(२३२५ /२०१९)
९ — ३९
SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 NASIK-6

					चौ.मि.
१	पहिला	श्री.विवेक प्रभाकर कासार	२४.१६	३७.१७	२.४५
५	पहिला	श्री. विवेक प्रभाकर कासार	२४.१६	३७.१७	१५
६	दुसरा	श्री.मिलींद सुरेश पांडकर	२५.५५	३७.१७	२.४५
८	दुसरा	श्रीमती शोभा चिंतामन कोठावदे	२४.१६	३७.१७	-०.७१
९	दुसरा	श्री.प्रभाकर रामकृष्ण काटकर	२४.१६	३७.१७	-८.३९
१०	दुसरा	सौ.सुलोचना पद्माकर काटकर	२४.१६	३७.१७	१५
११	तिसरा	श्री.दिनकर कल्याणराव देशमुख	२५.५५	३७.१७	२.४५
१२	तिसरा	सौ.चंद्रसेना रमेश गायकवाड	२५.५५	३७.१७	-०.६१
१५	तिसरा	श्री.रविंद्र मोरेश्वर कुलकर्णी	२५.५५	३७.१७	१५
१६	चौथा	श्री.प्रथमेश मोहन फाटक	२४.१६	३७.१७	२.४५
१७	चौथा	श्री.प्रकाश त्र्यंबक काण्णव	२४.१६	३७.१७	-०.६१
२०	चौथा	श्रीमती यशोदा खंदारे	२४.१६	३७.१७	१५
		एकूण	२९५.४८	४४६.०४	५९.४८

सदर मिळकतीमधील नविन कार्पेट बांधकाम क्षेत्र ७७४.३६ चौ मी आहे. त्यापैकी मूळ फ्लॅट धारकांना विना मोबदला मिळणारे कार्पेट क्षेत्र ४४६.०४ चौ मी आहे. मूळ फ्लॅट धारकांना कार्पेट क्षेत्र पेक्षा जास्त ५९.४८ चौ मी क्षेत्र लिहून घेणार देत असून सदर अतिरिक्त क्षेत्राचा मोबदला रुपये ६७,५०,०००/- विकासकांना मिळणार आहे. विकासकांना विकण्यासाठी मिळणारे कार्पेट क्षेत्र २६८.८४ चौ मी इतके आहे.

७. सदर मिळकतीमधील बांधकामाचे नाशिक महानगरपालिकेला भरायचे एकूण विकसन मूल्य रुपये ८४११००.०० आहे. त्यामुळे मूळ मालकांच्या वाट्याला येणारे विकसन मूल्य रुपये ४८४४८२.९८ होते. (८४११०० * ४४६.०४ /७७४.३६).

८. उपरोक्त प्लॉट मिळकतीत बांधकाम करणेसाठी नाशिक महानगरपालिकेकडून इमारत बांधकामाचा नकाशा पक्ष नंबर १ यांनी मंजुर करून घेतल्यानंतर म्हणजेच सँक्शन ऑफ बिल्डींग परमीट ॲण्ड कर्मेसमेंट सर्टीफिकेट मिळाल्यानंतर पक्ष नंबर २ यांनी प्लॉट मिळकतीत हल्ली असलेली इमारत पाडून प्लॉट मिळकतचा प्रत्यक्ष खुला कबजा पक्ष नंबर १ यांना देणेचा आहे. पक्ष नंबर २ यांनी पक्ष नंबर १ यांना प्लॉटचा कबजा दिल्याचे तारखेपासून चोवीस महिने मुदतीत पक्ष नंबर १ यांनी इमारतीचे बांधकाम पुर्ण करणेचे आहे. तथापी बांधकाम पुर्ण करणेसाठी काही तांत्रीक, कायदेशीर अथवा नैसर्गिक अडचण/अडथळा आल्यास त्याचे निवारण करणेसाठी जितका कालावधी लागेल तितका कालावधी वाढवून देण्याचे पक्ष नंबर २ यांनी मान्य केले आहे. तथापि बांधकाम पुर्ण करणेस चोवीस महिने पेक्षा जादा कालावधी लागल्यास जादा लागणाऱ्या कालावधीसाठी

नमुना-६
दस्त क्र.(2324 /2019)
१० — ३६

पक्ष नंबर १ यांनी पक्ष नंबर २ यांचे सभासदांना दरमहा रूपये सात हजार प्रमाणे भरपाई देणेची आहे. पक्ष नंबर २ यांनी प्लॉट मिळकतचा प्रत्यक्ष खुला कबजा पक्ष नंबर १ यांना दिल्याचे तारखेपासून ते पक्ष नंबर २ यांचे सभासदांना नवीन सदनिकांचा कबजा पक्ष नंबर १ यांचेकडून मिळेपावेतोचे कालावधीसाठी पक्ष नंबर २ यांचे सभासदांनी त्यांचे रहिवासाची सोय स्वखर्चाने करणेची आहे. त्याबाबत पक्ष नंबर १ यांचेवर कोणतीही जबाबदारी नाही.

९. पक्ष नंबर २ यांचे सभासदांना मिळणाऱ्या सदनिकां संबंधाने जी.एस.टी. व अन्य करांच्या रकमेची आकारणी झाल्यास ती रक्कम तसेच सदनिकांचे खरेदीखतासाठी लागणारे मुद्रांक व नोंदणीशुल्काची रक्कम पक्ष नंबर २ यांचे सभासदांनी त्यांना मिळणार असलेल्या सदनिकासाठी वैयक्तिकरित्या त्यांचे पदरखर्चाने भरणेची व सोसणेची आहे. पक्ष नंबर २ यांचे सभासदांना देणेत येणाऱ्या सदनिकात पक्ष नंबर १ यांनी त्यांचे खर्चाने विज व पाणी पुरवठा उपलब्ध करून देणेचा आहे. त्याबाबत पक्ष नंबर २ यांचे सभासदांची कोणतीही आर्थिक जबाबदारी रहाणार नाही.

१०. पक्ष नंबर २ यांचे सभासदांकडे त्यांचे ताब्यातील सदनिका संबंधाने नाशिक महानगरपालिकेचे करांची रक्कम , विज व पाणी बिलाची रक्कम, कोणत्याही प्रकारचे कर्जाची रक्कम थकित असल्यास ती रक्कम संबंधीत सभासदाने पक्ष नंबर १ यांना प्लॉटचा कबजा देणेपुर्वी भरून देणेची आहे.

११. उपरोक्त प्लॉट मिळकतीत बांधकाम करणेसाठी लागणारा संपूर्ण खर्च पक्ष नंबर १ यांनी त्यांचे पदरखर्चाने करावयाचा व सोसावयाचा आहे.

१२. उपरोक्त प्लॉट मिळकतीत बांधकाम करणेसाठी व पक्ष नंबर १ हे प्लॉट मिळकतीत बांधणार असलेल्या इमारतीतील सदनिका क्रमांक २, ३, ४, ७, १३, १४, १८ व १९ या सदनिकांची विक्री करणेसाठी पक्ष नंबर २ यांनी पक्ष नंबर १ यांना कायमस्वरूपी खालीलप्रमाणे हक्क दिले आहेत.

१२.१ उपरोक्त प्लॉट मिळकतीचे संबंधीत सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती महसुल कार्यालयातुन, भुमी अभीलेख कार्यालयातुन, न्यायालयातुन काढणेसाठी अर्ज करणे, नक्कल शुल्क भरणे, नकला स्विकारणे तसेच आवश्यकतेनुसार प्लॉट मिळकतीची मोजणी करून प्लॉट मिळकतीच्या हद्दी कायम करून घेणे.

१२.२ उपरोक्त प्लॉट मिळकतीचा वापर बिनशेतीकडे करणेसाठी अथवा हल्लीचे बिनशेती परवानगीत बदल करून घेणेसाठी मे.जिल्हाधिकारी साहेब, मे.उपविभागीय अधिकारी साहेब, मे.तहसिलदार साहेब यांचे कार्यालयात अर्ज करणे, कागदपत्र दाखल

नसन-६
दस्त क्र.(२३२५ /२०१९)
१९ — ३६

करणे, जबाब देणे, प्रतिज्ञापत्र, हमीपत्र, बंधपत्र, करारनामा व इतर आवश्यक दस्तऐवज लिहून देणे, चौकशीसाठी हजर राहणे, प्लॉट मिळकतीची भूमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करून मोजणी नकाशा दाखल करणे, आदेशानुसार रूपांतरीत कराची व बिनशेती करांची रक्कम भरणे व बिनशेती आदेश व सनद मिळविणे. प्लॉट मिळकत बिनशेतीकडे वर्ग झाल्यानंतर त्याची नोंद मिळकतीचे अधिकार अभिलेखात करून घेणे. उपरोक्त प्लॉट मिळकत बिनशेतीकडे वर्ग करणेसाठी अथवा अस्तित्वात असलेल्या बिनशेती परवानगीत बदल करून घेणेसाठी सर्व कायदेशिर कामांची व कागदपत्रांची पुर्तता करणे.

१२.३ उपरोक्त प्लॉट मिळकतीत व त्यातील इमारतीत विजेचे तात्पुरते/कायमचे कनेक्शन मिळविण्यासाठी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचे कार्यालयात अर्ज करणे, दस्तऐवज दाखल करणे, कोटेशन भरणे, कंपनीचे नियमानुसार अनामत रक्कम भरणे, टेस्ट व वायरिंग रिपोर्ट सादर करणे व कनेक्शन मिळविण्यासाठी ज्या कामांची, कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे त्या सर्व कागदपत्रांची व कामांची पुर्तता करणे. प्लॉट मिळकतीत बांधकाम पुर्ण केल्यानंतर प्रत्येक सदनिका धारकांच्या नावाने स्वतंत्र विजेचे कनेक्शन मिळविणेसाठी वर वर्णन केलेली सर्व कामे करणे, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडून अनामतची रक्कम परत मिळविणे असल्यास त्यासाठी अर्ज करणे, अनामत रकमेचा चेक स्विकारणे, पावती लिहुन देणे, विजेचे कनेक्शन मिळाल्यानंतर वेळचे वेळी विजेची बिले भरणे.

१२.४ उपरोक्त प्लॉट मिळकतीत व त्यातील इमारतीत पाणी पुरवठा उपलब्ध करून मिळविणेसाठी नाशिक महानगरपालिकेचे संबंधीत कार्यालयाकडे अर्ज करणे, कागदपत्र दाखल करणे, अनामत रक्कम भरणे, नळ जोडणी शुल्क भरणे, नाशिक महानगरपालिकेचे नियमानुसार आवश्यक त्या सर्व कामांची पुर्तता करून देणे व पाणी पुरवठा उपलब्ध करून घेणे.

१२.५ खरेदीखताचा दस्तऐवज पुर्ण करणेसाठी प्रचलित असलेल्या कायदयानुसार किंवा नविन येणाऱ्या कायदयानुसार ज्या काही परवानग्या काढाव्या लागतील त्या परवानग्या मिळविणेसाठी अर्ज करणे, त्यावर सही करणे, नोटीस देणे, कागदपत्रांची पुर्तता करणे, परवानगी मिळविणेकामी आवश्यक असलेली व कायदयाने जरूर असलेली सर्व कामे, कृत्ये करणे व परवानगी मिळविणे तसेच मिळालेल्या परवानगीची मुदतवाढ मिळणेसाठी सर्व कायदेशीर कामांची व कागत्रपत्रांची पुर्तता करून मुदतवाढ मिळविणे.

१२.६ खरेदीखत पुर्ण करणेसाठी जरूर पडल्यास इन्कमटॅक्स क्लिअरन्स सर्टीफिकेट अगर पुर्व परवानगी, नाहरकत दाखला मिळविणे असल्यास त्यासाठी आवश्यक असलेले सर्व अर्ज प्रकरणे, प्रतिज्ञापत्र करणे, कागदपत्रांची पुर्तता करणे, जबाब देणे.

नसन-६
दस्त क्र.(2324 /२०१९)
१२— ३६

१२.७ उपरोक्त प्लॉट मिळकतीत बांधकाम करणेसाठी अथवा नवीन/वाढीव बांधकाम करणेसाठी नियोजित इमारतीचे बांधकाम नकाशे तयार करणे, ते मंजूरीसाठी नाशिक महानगरपालीकेच्या कार्यालयात दाखल करणे, बेटरमेंट चार्जेस, डेव्हलपमेंट चार्जेस व इतर शुल्क भरणे, नाशिक महानगरपालीकेच्या सबंधीत अधिकाऱ्यांनी बांधकाम नकाशात दुरूस्ती सुचविलेस त्यानुसार बांधकाम नकाशात दुरूस्ती करणे,आवश्यक असलेले कागदपत्र, प्रतिज्ञापत्र, डिक्लरेशन दाखल करणे, नाशिक महानगरपालिकेने मंजूर केलेल्या बांधकाम नकाशानुसार इमारतीचे बांधकाम पुर्ण करणे, बांधकाम पुर्णत्वाचा व वापर करणे बाबतचा दाखला मिळविणे.

१२.८ उपरोक्त प्लॉट मिळकतीत बांधकामाशी संबंधीत कामे करणेसाठी पक्ष नंबर १ व त्यांचे अधिकारी, प्रतिनिधी, नातेवाईक, कर्मचारी, आर्किटेक्ट, इंजिनिअर्स, कुशल व अकुशल कामगार व इतर संबंधीत इसमांना सदर प्लॉट मिळकतीत जाणेचा, तेथे थांबण्याचा, मोजणी करून कंपाऊंड करण्याचा, पक्ष नंबर १ यांना त्यांचे नांवाचा बोर्ड लावणेचा, तात्पुरत्या स्वरूपाचे बांधकाम करणेचा, मंजूर बिल्डींग प्लॅनप्रमाणे कायमस्वरूपी बांधकाम करणेचा हक्क राहील. सदरची कामे करणेसाठी पक्ष नंबर २ यांनी पक्ष नंबर १ यांना कधीही रद्द न होणारा परवाना (इर्रिव्होकेबल लायसेन्स) दिला असून प्लॉट मिळकतीचा प्रत्यक्ष खुला कबजा पक्ष नंबर १ यांना देणेचा आहे. या कराराप्रमाणे प्लॉट मिळकतीत बांधकाम करणेसाठी प्लॉट मिळकतीत जी जी कामे करावी लागतील ती ती सर्व कामे करणेचा पक्ष नंबर १ यांना हक्क राहील.

१२.९ उपरोक्त प्लॉट मिळकतीत पक्ष नंबर १ करणार असलेल्या बांधकामापैकी मोबदल्यापोटी पक्ष नंबर २ यांना वर नमुद केल्याप्रमाणे इमारतीतील सदनिका क्रमांक १, ५, ६, ८, ९, १०, ११, १२, १५, १६, १७ व २० अशा एकूण १२ सदनिका व्यतिरिक्त उर्वरीत सदनिकांची विक्री करणेसाठी अथवा हस्तांतर करणेसाठी इच्छूक ग्राहकांबरोबर बोलणी करणेचा, त्यासंबंधी साठेखत करारनामा (ॲग्रीमेंट ऑफ सेल) खरेदीखते लिहून देणेचा, किंमतीपोटी रक्कम स्विकारणेचा व सदरचे दस्त मे. सह दुय्यम निबंधक साहेब वर्ग-२, नाशिक यांचे कार्यालयात नोंदविणेसाठी हजर करणेचा, आवश्यक असलेल्या कागदपत्रांची व कामांची पुर्तता करून दस्त नोंदविणेचे काम पूर्ण करणेचा पक्ष नंबर १ यांना हक्क राहील. पक्ष नंबर १ यांनी लिहुन व नोंदवून दिलेली दस्तऐवज, करारनामा कोणतेही कारणास्तव रद्द करावयाचे असल्यास त्यासाठी दस्तऐवज, करारनामा रद्द केल्याचा दस्त तयार करणेचा, त्यावर सह्या करणेचा व सदरचे दस्त मे.सह दुय्यम निबंधक साहेब वर्ग-२, नाशिक यांचे कार्यालयात नोंदवुन घेणेचा पक्ष नंबर १ यांना अधिकार राहील. पक्ष नंबर १ यांनी प्लॉट मिळकतीत इमारतीचे बांधकाम पूर्ण केल्यानंतर व पक्ष नंबर १ यांचे हिश्याच्या सदनिकांची विक्री केल्यानंतर सदनिका खरेदीदारांना पक्ष नंबर २ संस्थेचे सभासद करून

नसन-६
दस्त क्र.(2325 /2019)
93 — 3E



घेणेस पक्ष नंबर २ यांनी मान्यता दिली असुन सदनिका खरेदीदारांना सोसायटीचे नियमानुसार सभासद होणे बंधनकारक राहील.

१२.१० उपरोक्त प्लॉट मिळकतीत बांधकाम करणेसाठी मुदतवाढ मिळणेसाठी आणि इमारतीतील पक्ष नंबर १ यांचे हिश्याच्या सदनिकांची विक्री करणेसाठी प्रचलित कायद्यान्वये परवानगी मिळणेसाठी अर्ज करणे, प्रतिज्ञापत्र देणे, कागदपत्र दाखल करणे व बांधकामासाठी आणि त्यांचे विक्रीसाठी ज्या परवानग्या मिळविणे आवश्यक आहे त्या सर्व परवानग्या मिळविणेचा अधिकार पक्ष नंबर १ यांना राहिल.

१३. उपरोक्त प्लॉट मिळकतीत पक्ष नंबर १ हे बांधकाम करणार असलेल्या इमारतीतील पक्ष नंबर १ यांचे हिश्याच्या सदनिका कोणत्याही बँक, पतसंस्था, व्यक्ती किंवा संस्थेस गहाण/तारण देवून त्यांचेकडून पक्ष नंबर १ यांना कर्ज घ्यावयाचे असल्यास तसा हक्क पक्ष नंबर १ यांना राहील. मात्र पक्ष नंबर १ घेणार असलेल्या कर्जाबाबत पक्ष नंबर २ यांची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. प्लॉट मिळकतीतील बांधकामांपैकी पक्ष नंबर २ यांना मोबदला म्हणुन देण्यात येणाऱ्या सदनिकांचे व्यतीरिक्त उर्वरीत सदनिकांचे विक्रीतून पक्ष नंबर १ यांना जो नफा होईल त्या रकमेवर आयकर भरणेची जबाबदारी सर्वस्वी पक्ष नंबर १ यांची राहील. प्लॉट मिळकतीचे विकसनातून पक्ष नंबर १ यांना होणारा नफा अथवा नुकसानीशी पक्ष नंबर २ यांचा कोणताही संबंध राहणार नाही.



१४. पक्ष नंबर १ यांनी त्यांचे जबाबदारीवर उपरोक्त प्लॉट मिळकत विकसित करणेची आहे. प्लॉट मिळकतीत बांधकाम करतेवेळी शासनाकडून, नाशिक महानगरपालीकेकडून, न्यायालयाकडून अथवा कोणत्याही शासकीय, निमशासकीय विभागाकडून, कोणत्याही कारणास्तव करांची, दंडाची, शुल्काची आकारणी झाल्यास ती संपूर्ण रक्कम पक्ष नंबर १ यांनी त्यांचे पदरखर्चाने भरावयाची आहे. सदर रक्कम पक्ष नंबर २ यांना भरावी लागल्यास त्याची भरपाई पक्ष नंबर १ यांनी पक्ष नंबर २ यांना करून द्यावयाची आहे. पक्ष नंबर १ यांचे व ते विक्री करणार असलेल्या सदनिका खरेदीदारांचे दरम्यान कोणत्याही स्वरूपाचा वाद निर्माण झाल्यास त्याची कोणतीही जबाबदारी पक्ष नंबर २ यांचेवर राहणार नाही असे पक्ष नंबर १ यांनी मान्य केले आहे. मिळकतीत बांधकाम करतांना दुर्दैवाने त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास त्या सबंधीची कोणतीही कायदेशिर अथवा आर्थिक जबाबदारी पक्ष नंबर २ यांचेवर राहणार नाही.

१५. उपरोक्त प्लॉट मिळकत विकसित करणेसाठी व पक्ष नंबर १ यांचे हिश्याचा सदनिकांची विक्री करणेसाठी व अन्य संबंधीत कामांसाठी ज्या अर्जावर, कागदपत्रांवर व दस्तऐवजांवर पक्ष नंबर २ यांच्या सह्यांच्या/संमत्यांची गरज असेल त्या अर्जावर,

नमुना-६
दस्त क्र. 2324/2019
१४— ३६

कागदपत्रांवर व दस्तऐवजांवर विना तक्रार व विना विलंब पक्ष नंबर २ सह्या/संमत्या देतील अथवा पक्ष नंबर २ यांचे मुखत्यार म्हणुन पक्ष नंबर १ यांनी सहया कराव्यात.

१६. वर वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीचे विकसनाकामी कोणत्याही शासकिय, निमशासकीय कार्यालयात पक्ष नंबर २ यांचे नांवाने कोणतीही रक्कम अगर ठेव पक्ष नंबर १ यांनी जमा (डिपॉझीट) केल्यास ती रक्कम अगर ठेव परत घेण्याचा पक्ष नंबर १ यांना अधिकार राहिल. त्याचेशी पक्ष नंबर २ यांचा कोणताही संबंध राहणार नाही.

१७. उपरोक्त प्लॉट मिळकतीत बांधकाम करणेसाठी टी.डी.आर. चे नियमांनुसार पक्ष नंबर २ यांचे नांवाने पक्ष नंबर १ यांनी टी.डी.आर. खरेदी करून त्याचा उपरोक्त प्लॉट मिळकतीत बांधकाम करणेसाठी वापर केल्यास त्याकामी कोणतीही हरकत उपस्थित करणेचा, मोबदला वाढवून मागणेचा अथवा बांधकामामध्ये अडथळा निर्माण करणेचा पक्ष नंबर २ यांना हक्क राहणार नाही. पक्ष नंबर १ यांनी इमारतीचे बांधकामासाठी टी.डी.आर. खरेदी केल्यास त्यासाठी लागणारी रक्कम पक्ष नंबर १ यांनी खर्च करणेची आहे.

१८. वर वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीबाबत पक्ष नंबर २ हे खालील गोष्टी जाहीर करतात व खात्रीने सांगून भरवशाने लिहून देतात की, उपरोक्त प्लॉट मिळकतीत पक्ष नंबर २ यांचे व्यतीरिक्त अन्य कोणाचाही मालकी अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध नाही. सदर प्लॉट मिळकत पक्ष नंबर २ यांनी गहाण, दान, लिन, लिज, अन्न-वस्त्र, मृत्युपत्र, साठेखत करारनामा अथवा अन्य कोणत्याही दस्तऐवजांनी जडजोखमीत गुंतविलेली नाही. सदर प्लॉट मिळकतीबाबत आजमितीस कोणत्याही कोर्टात, सरकारी दरबारी कोणताही वाद चालू नाही. सदर प्लॉट मिळकत विकसीत करू नये असा मे. कोर्टाचा मनाई हुकूम नाही. उपरोक्त प्लॉट मिळकतीचे संदर्भात कोणत्याही कोर्टात, शासकीय वा निमशासकीय कार्यालयात कोणत्याही प्रकारचे हमी पत्र (अंडरटेकिंग) पक्ष नंबर २ यांनी दिलेले नाही. सदर प्लॉट मिळकतीबाबत हद्दीचा वाद, क्षेत्रासंबंधी वाद, मालकीहक्का संबंधी वाद, हिस्यासंबंधी वाद, रस्त्यासंबंधी वाद नव्हता व नाही. उपरोक्त प्लॉट मिळकत संपादित, अधिग्रहीत झालेली नाही व त्याबाबत आजपावेतो पक्ष नंबर २ यांना नोटीस आलेली नाही. इतःपरही प्लॉट मिळकतीचे मालकीहक्कात कोणताही दोष आढळून आल्यास अथवा सदर प्लॉट मिळकतीवर पक्ष नंबर २ यांनी कोणत्याही प्रकारचा बोजा निर्माण केला आहे असे आढळल्यास अथवा सदर व्यवहारास कोणी हरकत घेतल्यास त्याचे निवारण पक्ष नंबर २ त्यांचे पदरखर्चाने करून देतील, पक्ष नंबर १ यांना तोशीष लागु देणार नाही. सदर प्लॉट मिळकतीचे अधिकार अभिलेखात इतर अधिकार सदरी प्लॉट मिळकत विकसीत करणार म्हणून पक्ष नंबर १ यांनी त्यांचे नांबाची नोंद करून घ्यावी, त्यासाठी योग्य ते सहकार्य पक्ष नंबर २ हे पक्ष नंबर १ यांना देतील.

नमुना-६
दस्त क्र. २३२५ /२०११
१५ — ३६



१९. या करारात ठरलेल्या अटी व शर्तींप्रमाणे प्लॉट मिळकतीतील विकसनाची व विक्रीची कामे पुर्ण होईपावेतो व त्यानंतर सदर प्लॉट मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा बोजा पक्ष नंबर २ निर्माण करणार नाहीत अगर प्लॉट निळकत विकसित करून त्यातील पक्ष नंबर १ यांचे हिश्याच्या सदनिकांची विक्री करणे अशक्य होईल असे कोणतेही कृत्य पक्ष नंबर २ करणार नाहीत.

२०. उपरोक्त प्लॉट मिळकतीचे विकसनाकामी व विक्रीकामी जी कामे करावी लागणार आहेत ती कामे करणेसाठी पक्ष नंबर १ यांचे लाभात पक्ष नंबर २ यांनी जनरल मुखत्यारपत्र लिहून दिले आहे. सदर मुखत्यारपत्राचे आधारे मुखत्यारपत्रात नमुद केलेली कामे करणेचा अधिकार पक्ष नंबर १ यांना राहील.

